वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे

**महाराष्ट्र शासन**

# उप वनसंरक्षक,नांदेड वनविभाग,नांदेड यांचे कार्यालय

गट क्र.120, असर्जन,पदमजा सिटी रोड, नविन कौठा परिसर, नांदेड 431 606

दूरध्वनी क्र :02462-235562 Email ID : dycfnanded@mahaforest.gov.in

---

जा.क्र.अ/विक्री/ई-लिलाव/533 /2024-25 दिनांक 18 /07/2024

**प्रति,**

**इमारती व जळावू वनोपज खरेदीदार (सर्व)**

**ई-लिलाव**

**विषय**:- वनोपज खरेदीदार यांचे EMD रक्कम भरणा करणे बाबत

**संदर्भ**:-1.मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील जा.क्र.कक्ष.-16/ए-2/प्र.क्र.34/भाग-3/298 दिनांक 13.06.2024

2.मा. वनसंरक्षक (प्रादेशिक)छत्रपती संभाजीनगर यांचे कडील जा.क्र.कक्ष-4/ विक्री/प्र.क्र.15(2023-24)/989,दिनांक 18.06.2024

ई-लिलाव अंतर्गत इमारती व जळावू वनोपज खरेदीदार (सर्व) यांना सुचित करण्यांत येते की, महसूल व वनविभाग,शासन निर्णय क्रमांक एफएफपी-2012/प्र.क्र.01/फ-9 दिनांक 15.01.2020 चे सहपत्र, जोडपत्र "अ" मधील **इसा-याची रक्कम** नियम क्र.3 (अ) नुसार " ईच्छुक बोलीदारांनी बोली बोलण्यापूर्वी त्याची ज्या रक्कमेपर्यंतची बोली बोलण्याची इच्छा असेल त्या रक्कमेच्या 10 टक्के रक्कम इसा-याची रक्कम म्हणून लिलावाच्या सुरवातीला उल्लेखीत रितीने जमा केल्याखेरीज त्या बोलीदाराला बोली बोलण्याची परवानगी देण्यात येणार नाही." असे नमुद केले आहे.

परंतू या कार्यालयास असे निदर्शनास आले आहे की, बहुतांश इमारती व जळावू वनोपज खरेदीदार उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदीनुसार 10 टक्के इसा-याची (EMD) रक्कम न भरताच ई-लिलावात सहभागी होतात.

तरी, सर्व इमारती व जळावू वनोपज खरेदीदार यांनी महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक एफएफपी-2012/प्र.क्र.01/फ-9 दिनांक 15.01.2020 मधील नियम क्र.3 (अ) नुसार " ईच्छुक बोलीदारांनी बोली बोलण्यापूर्वी त्याची ज्या रक्कमेपर्यंतची बोली बोलण्याची इच्छा असेल त्या रक्कमेच्या 10 टक्के रक्कम इसा-याची रक्कम म्हणून लिलावाच्या सुरवातीला उल्लेखीत रितीने जमा केल्यानंतरच ई-लिलावात सहभाग घेण्यांत यावा, याची त्यांनी नोंद घ्यावी.

**(केशव वाबळे)**
**उप वनसंरक्षक,**
**नांदेड वनविभाग,नांदेड**

**प्रतिलिपी**:-मा.वनसंरक्षक (प्रादेशिक)छत्रपती संभाजीनगर यांना संदर्भीय पत्र क्र.2 चे अनुषंगाने माहितीस्तव सविनय सादर.

**प्रतिलिपी**:-श्री.मोहन,एनआयसी प्रतिनिधी यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना. त्यांनी सदर पत्र ई-लिलावाच्या पोर्टलमध्ये News मध्ये सतत Publish होण्याबाबत कार्यवाही करण्यांत यावी.